# राजीव गांधी सुवर्ण चषक अखिल भारतीय कबड्डी स्पर्धा
# पुरूष गटात एअर इंडिया तर महिलांमध्ये हरियाणा स्पोर्टस अजिंक्य
## रायगड जिल्हा गटात नवजीवन पेझारीची बाजी

पनवेल (प्रतिनिधी) अजय कुमार, राहुल चौधरी आणि पवन कुमार या आंतरराष्ट्रीय खेळाडूंच्या अनुभव आणि कौशल्याचा उत्तम उपयोग करून घेणाऱ्या एअर इंडियाने राजीव गांधी सुवर्ण चषक अखिल भारतीय कबड्डी स्पर्धेमध्ये केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाला अगदी सहजपणे ३९-२० अशा फरकाने लोळवून पुरूषांचे विजेतेपद पटकाविले. तर महिलांच्या गटात हरियाणा स्पोर्टस या संघाने बाजी मारत विजेतेपदाचे किताब पटकाविले. त्यांनी मुंबईच्या शिवशक्ती संघाला नमवले. दोन्ही अजिंक्य संघांना प्रत्येकी रोख दोन लाख रूपये आणि भव्य सन्मानचिन्ह तर उपविजेत्या संघास दिड लाख रूपये आणि चषक देवून सन्मानित करण्यात आले. आयपीएलचा अंतिम सामना असतानाही पाच हजारहून अधिक कबड्डी रसिक यावेळी उपस्थित होते. यावेळी प्रसिध्द हास्य अभिनेते जॉनी लिव्हर यांची विशेष उपस्थिती होती.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्यावतीने आणि ॲम्युचर कबड्डी फेडरेशन ऑफ इंडिया, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन व रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या मान्यतेने खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर महाविद्यालयाच्या भव्य क्रिडांगणावर (लोकनेते दि.बा.पाटील क्रिडानगरीत) झालेल्या अखिल भारतीय स्तरावरील 'राजीव गांधी सुवर्ण चषक कबड्डी स्पर्धा २०१४' या स्पर्धेचे रविवारी अंतिम सामने व पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. या कार्यक्रमास श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे संस्थापक लोकनेते रामशेठ ठाकूर, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे उपाध्यक्ष मुश्ताक अंतुले, जिल्हाध्यक्ष आर.सी.घरत, आमदार प्रशांत ठाकूर, प्रो-कबड्डी कोलकता टिमचे मालक संदीप जी, कबड्डी महासंघाचे महासचिव जगदिश्वर यादव, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष अरूणशेठ भगत, सचिव महेंद्र घरत, नगराध्यक्षा चारूशिला घरत, उपनगराध्यक्ष मदन कोळी, शिक्षण मंडळाचे सभापती वाय.टी.देशमुख, गटनेते अनिल भगत, राज्य कबड्डी असोसिएशनचे कार्याध्यक्ष डॉ.दत्ता पाथरीकर, विश्वास मोरे, शरद कदम, रायगड जिल्हा कबड्डीचे माजी अध्यक्ष नथुराम पाटील, शहर कॉंग्रेसच अध्यक्ष जयंत पगडे, कार्याध्यक्ष अरविंद सावळेकर, युवा नेते परेश ठाकूर, नगरसेवक प्रकाश बिनेदार, मनोहर म्हात्रे, संतोष शेट्टी, गणेश पाटील, लतीफ शेख, सीकेटी महाविवल्याचे प्राचार्य डॉ.एस.टी.गडदे, रायगड जिल्हा कॉंग्रेसचे उपाध्यक्ष सुदाम पाटील, मानव संसाधन विभागाचे जिल्हाध्यक्ष अभिजीत पाटील, चेस असोसिएशनचे तालुकाध्यक्ष गंभीर दांडेकर, शिवाजी दुर्गे, सुर्यकांत ठाकूर, रामनाथ पाटील, वसंत काठावले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

अंतिम सामन्यात एअर इंडियाची सुरूवात जबरदस्त झाली. त्यांनी केवळ सहा मिनिटांमध्ये सुरक्षा दलावर लोण चढविला व १३-६ अशी आघाडी घेतली. अजय आणि राहुल यांच्या चढायांना एक वेगळीच धार दिसत होती. सुरक्षा दलाची भिस्त अर्थात वझीर सिंगवर होती व त्याने तो विश्वास सार्थ ठरविला. वझीरला बोनस गुण घेऊ द्यायचा पण त्याची पकड करण्याच्या भानगडीत पडायचे नाही हा पवित्रा एअर इंडियाने घेतला तो नुकसान टाळण्यासाठी तरीही वझीरने 'बैठी' आणि 'साईड-किक' वर जे गुण मिळविले ती दृश्य चित्तथरारक होती. त्यांच्या दीपकनेही थोडी फार चमक दाखवली पण ते पुरेसे नव्हते. एअर इंडियाचे क्षेत्ररक्षणही जबरदस्त होते. गोकुळ शितोळे, दीपक झंझोटे आणि प्रशांत चव्हाण या अनुभवी 'कॉर्नर'नी वझीरचा अपवाद सोडता सुरक्षा दलाच्या आक्रमकांना थोडादेखील वाव दिला नाही. एअर इंडिया आज काहीही चुकीचे करणार नाही असेच सतत दिसत होते. एअर इंडियाची मध्यंतराला असलेली २५-१२ ही आघाडी फारच बोलकी होती. वझीरने तरीही प्रयत्नांची पराकाष्ठा केली. त्याने एक-एकदा प्रतिस्पर्ध्यांचे कोपरे टिपले पण त्याला त्यापुढे काही साध्य झाले नाही. पाच मिनिटे बाकी असताना ३७-२० अशी स्थिती होती व तेव्हाच सुरक्षा दलाने 'हॅण्डस-अप' करून शरणागती पत्करल्याचे पाहावयास मिळाले.

धरमवीर पुनिया या क्रीडा प्रशिक्षकाच्या हरियाणा स्पोर्टसने शिवशक्तीला आधुनिक कबड्डीचे धडेच जणू दिले. कर्णधार मोनिका सिवाच आणि पूजा यांचा झंझावात रोखणे शिवशक्तीला जमले नाही. जेव्हा मध्यंतरापूर्वी दोन लोण घेतल्यानंतर शिवशक्तीला पूजा आणि अंजू या दोन आक्रमकांना टिपण्यात यश आले त्यानंतरही त्यांना हरियाणावर दबाव वाढवून स्थितीचा फायदा घेता आला नाही. मध्यंतराला शिवशक्ती १०-२२ अशी पिछाडीवर होती. २४-११ अशी गुणसंख्या झाली तेव्हा अंजू उठली आणि शिवशक्तीच्या अडचणी वाढल्या. आपण जिंकलो याची खात्री झालेल्या हरियाणाने सोपस्कर पूर्ण केले.

राज्याच्या कबड्डीत आघाडीवर असणाऱ्या रायगड जिल्हा कबड्डी गटातील अंतिम सामन्यात नवजीवन पेझारी या संघाने गणेश क्लब उरण संघाचा २४-१६ असा पराभव करून ८१ हजार रूपयांचे पारितोषिक पटकाविले. या स्पर्धेमध्ये गणेश कुवचे, पंकज म्हात्रे आणि राहुल सणस यांना सर्वोत्तम बचावपट्टू आणि आक्रमक खेळाडू म्हणुन निवडले गेले तर सर्वोत्तम खेळाडूचा मान नवजविन पेझारी संघाच्या निलेश पाटील यांनी मिळविला.

राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेमधील अन्य पुरस्कार प्राप्त खेळाडू असे- सर्वोत्तम बचावपटूः गोकुळ शितोळे (एअर इंडिया)- पूजा (हरियाणा), सर्वोत्तम आक्रमक ः वझीर सिंग (सीआयएसएफ)-अपेक्षा टकले (शिवशक्ती), स्पर्धेमध्ये सर्वोत्तम ः अजय ठाकूर (एअर इंडिया)-मोनिका सिवाच (हरियाणा). स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडूंना प्रत्येकी रोख २५ हजार तर इतरांना प्रत्येकी १५ हजार रूपये रोख देण्यात आले.